# कृषिदर्शनी २०१८

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले नविन वाण



**बाजरी – फुले महाशक्ती**

(डी एचबीएच १२११)

या संकरित वाणाची महाराष्ट्रातील खरीप हंगामात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.

**राजमा – फुले राजमा**

(जीआरबी ९०२)

हा वाण महाराष्ट्रातील खरीप हंगामात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.





**बरटी –फुले बर्टी**

(केओपीबीएम– ४६)

हा वाण महाराष्ट्रासाठी शिफारस करण्यात आला आहे.

**ऊस – फुले १0001**

(एमएस१०००१)

लवकर पक्व होणारा हा वाण महाराष्ट्रातील सुरु आणि पूर्व हंगाम लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.



# कृषिदर्शनी २०१८

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले नविन वाण

### भूईमूग -फुले भारती
(जे एल ७७६)

हा वाण महारष्ट्र, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तामीळनाडू आणि केरळ राज्यांसाठी रब्बी व उन्हाळी हंगामात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.






### ओट चारा - फुले सुरभी (आरओ-११-१)

देश पातळीवर पर्वतीय विभाग वगळता इतर चार विभागातील रब्बी बागायतीखाली एक कापणी पासून उच्च दर्जाच्या हिरव्या चाऱ्याच्या अधिक उत्पादनासाठी या वाणाची शिफारस करण्यात आली आहे.

### मारवेल गवत -फुले मारवेल १

देश पातळीवर मध्य विभागातील गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगढ व दक्षिण विभागातील तामीळनाडू राज्यांकरीता जिरायती भागासाठी उच्च दर्जाच्या हिरव्या चाऱ्याच्या अधिक उत्पादनासाठी बहुवार्षिक वाणाची शिफारस करण्यात आली आहे.





### मद्रास अंजन गवत - फुले मद्रास अंजन १

देश पातळीवर उत्तर पश्चिम विभागातील पंजाब, राजस्थान आणि मध्य विभागातील गुजरात मध्यप्रदेश, महाराष्ट्र या राज्यांकरिता जिरायती भागासाठी उच्च दर्जाच्या हिरव्या चाऱ्याच्या अधिक उत्पादनासाठी या बहूवार्षिक वाणाची शिफारस करण्यात आली आहे.



## टोमॅटो सिलेक्शन


फुले केसरी (सुधारित वाण)

हा अधिक बीटा कॅरोटीनयुक्त (५.८६ मि ग्रॅ/१००ग्रॅम ) तसेच नारंगी रंगाचा, अंडकृती आणि उत्कृष्ट साठवणक्षमता असणारा वाण पश्चिम महाराष्ट्रासाठी प्रसारित करण्यात आला आहे.

## घोसाळी

फुले कोमल

अधिक उत्पन्न, चमकदार हिरव्या रंगाची दंडगोलाकार फळे असणारा घोसाळीचा फुले कोमल हा संकरित वाण प्रसारित करण्यात आला आहे.






## सिताफळ फुले जानकी (संकर -१३)

अधिक उत्पादन, फळांचा आकर्षण हिरवा रंग, एकसारखा मोठा आकार, भरपूर गर आणि कमी बिया अशी वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म असणारा सिताफळाचा फुले जानकी हा वाण महाराष्ट्रात लागवडीसाठी प्रसारित करण्यात आला आहे.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले नविन अवजारे व यंत्रे



### शक्तीचलीत फुले ऊस बेणे कापणी यंत्र

ऊस रोपवाटीकेसाठी एक डोळयाचे उसाचे बेणे मोठया प्रमाणावर परिणामकारक कापण्याकरिता शक्तीचलीत (१ हॉर्सपावर, १ फेज विद्युत मोटार) फुले उस बेणे कापणी यंत्र प्रसारित करण्यात आला आहे.



### ट्रॅक्टरचलीत फुले उस रोपे लागवड यंत्र

ऊस रोपांची १२०-१५०× ६० मीटर अंतरावर लागवड करण्यासाठी ट्रक्टरचलित फुले ऊस रोपे यंत्राची शिफारस करण्यात येत आहे.